असा. क्र. ८

रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआयएन-राज्य/२०/९९

Amendment 1

9/2

9 अ

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, जानेवारी १६, १९९९/पौष २६, शके १९२०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (*3*) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Krishna Valley Development Corporation (Amendment) Act, 1998 (Mah. Act No. VIII of 1999), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRATIMA UMARJI,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

## MAHARASHTRA ACT No. VIII OF 1999.

(*First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 16th January 1999.*

An Act further to amend the Maharashtra Krishna Valley Development Corporation Act, 1996.)

WHEREAS it is expedient further to amend the Maharashtra Krishna Valley Development Corporation Act, 1996, for the purposes hereinafter appearing ; It is hereby enacted in the Forty-ninth Year of the Republic of India as follows :— (Mah. XV of 1996.)

1. This Act may be called the Maharashtra Krishna Valley Development Corporation (Amendment) Act, 1998. **Short title.**

Amendment of section 4 of Mah. XV of 1996.

2. In section 4 of the Maharashtra Krishna Valley Development Corporation Act, 1996, in sub-section (*1*), in clause (*n*), after the words " from the cadre of the Engineering services of the Irrigation Department " the words " or from amongst the suitable officers from any other services " shall be inserted.

Mah. XV of 1996.

2/2

(2) Amendment 2 1/4

(5) MKVDC/VIDC/KIDC/TIDC/GMIDC amendment

असा. क्र. ११ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०/२०००

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, जानेवारी ७, २०००/पौष १७, शके १९२१

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

### अनुक्रमणिका

पृष्ठे

सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९.—महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ आणि महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९८ यांत आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. ३३-३६

दिनांक ६ जानेवारी २००० रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रतिमा उमरजी,
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९.

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " महाराष्ट्र शासन राजपत्रात " दिनांक ७ जानेवारी २००० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ आणि महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९८ यांत आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

(१९९९ चा महा. अध्या. २१.) ज्याअर्थी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, दिनांक ८ ऑक्टोबर १९९९ रोजी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा) अध्यादेश, १९९९ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अध्यादेश " असा करण्यात आला आहे) प्रख्यापित केला होता ;

2/4



**आणि ज्याअर्थी,** दिनांक २२ ऑक्टोबर १९९९ रोजी राज्य विधानमंडळाची पुन्हा सभा भरल्यानंतर, राज्य विधानमंडळाची सत्रसमाप्ती दिनांक २३ ऑक्टोबर १९९९ रोजी झाल्यामुळे उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणारे विधेयक महाराष्ट्र विधानसभेत वेळेअभावी प्रस्तुत करता आले नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (क) द्वारे, तरतूद केल्याप्रमाणे, उक्त अध्यादेश राज्य विधानमंडळाची पुन्हा सभा भरल्याच्या दिनांकापासून ज्या तारखेस सहा आठवड्यांचा कालावधी संपतो, त्या ३ डिसेंबर १९९९ या तारखेनंतर जारी असल्याचे बंद झाले असते ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी कायद्याद्वारे, जारी असण्याचे चालू ठेवणे इष्ट आहे असे वाटते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उक्त अध्यादेशाच्या तरतुदी जारी असण्याचे चालू ठेवण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, उक्त अध्यादेश मागे घेऊन व त्याचे निरसन करून, त्यांनी दिनांक २ डिसेंबर १९९९ रोजी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा व चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९, भूतलक्षी प्रभावाने, म्हणजेच दिनांक ८ ऑक्टोबर १९९९ पासून प्रख्यापित केला ; १९९९ चा महा. अध्या. ३१.

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा व चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९, याचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे. **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पन्नासाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— १९९९ चा महा. अध्या. ३१.

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा व चालू ठेवणे) अधिनियम, १९९९ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ८ ऑक्टोबर १९९९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

---

(3/4)



१९९६ चा महा. १५. २. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ याच्या कलम १८ मधील, खंड (ब) मध्ये, पुढील मजकूर शेवटी जादा दाखल करण्यात येईल :— सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम १८ ची सुधारणा.

", आणि शासनाच्या कृषि विभागामार्फत ठिबक सिंचन योजनांना मदत करणे ".

१९९७ चा महा. २६. ३. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ याच्या कलम १८ मधील, खंड (ब) मध्ये, पुढील मजकूर शेवटी जादा दाखल करण्यात येईल :— सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम १८ ची सुधारणा.

", आणि शासनाच्या कृषि विभागामार्फत ठिबक सिंचन योजनांना मदत करणे ".

१९९८ चा महा. ३. ४. कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ याच्या कलम १८ मधील, खंड (ब) मध्ये, पुढील मजकूर शेवटी जादा दाखल करण्यात येईल :— सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १८ ची सुधारणा.

", आणि शासनाच्या कृषि विभागामार्फत ठिबक सिंचन योजनांना मदत करणे ".

१९९८ चा महा. ४. ५. महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ याच्या कलम १८ मधील, खंड (ब) मध्ये, पुढील मजकूर शेवटी जादा दाखल करण्यात येईल :— सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम १८ ची सुधारणा.

", आणि शासनाच्या कृषि विभागामार्फत ठिबक सिंचन योजनांना मदत करणे ".

१९९८ चा महा. २३. ६. महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९८ याच्या कलम १८ मधील, खंड (ब) मध्ये, पुढील मजकूर शेवटी जादा दाखल करण्यात येईल :— सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम १८ ची सुधारणा.

", आणि शासनाच्या कृषि विभागामार्फत ठिबक सिंचन योजनांना मदत करणे ".

5 (4/4)



सन १९९९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३१ याचे निरसन व व्यावृत्ती.

७. (१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ आणि महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा व चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९, हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९९९ चा मंहा. अध्या. ३१.

(२) अशा प्रकारे उक्त अध्यादेश निरसित करण्यात आला असला तरीही, त्या अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ किंवा यथास्थिति, महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९८ च्या तत्सम तरतुदींद्वारे, केलेली गोष्ट किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल. १९९६ चा महा. १५. १९९७ चा महा. २६. १९९८ चा महा. ३. १९९८ चा महा. ४. १९९८ चा महा. २३.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

Amendment-3

1/3

शुद्धीपत्रके

असा. क्र. १२

रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, जानेवारी १३, १९९७/पौष २३, शके १९१८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.

### अनुक्रमणिका

पृष्ठे

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.—महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ यात सुधारणा करण्याकरिता अधिनियम. .. १२२–१२४

दिनांक ९ जानेवारी १९९७ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रतिमा उमरजी,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

### सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.

[राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १३ जानेवारी १९९७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.]

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ यात सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९९६ चा महा. १५. १९९६ चा महा. अध्या. १८. आणि ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६, यात सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तावडतोब कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक २९ ऑक्टोबर १९९६ रोजी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (सुधारणा) अध्यादेश, १९९६ प्रख्यापित केला होता ;

2/3



आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ;
त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सत्तेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (सुधारणा) अधिनियम, १९९६ असे म्हणावे.

(२) तो दिनांक २९ ऑक्टोबर १९९६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ४ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४ मध्ये,— १९९६ चा महा. १५.

(एक) पोट-कलम (१) मध्ये, खंड (अ) च्या नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(अ-१) शासनाने नियुक्त करावयाचे दोन अशासकीय सदस्य. उपाध्यक्ष";

(दोन) पोट-कलम (३) मध्ये, "खंड (म)" या मजकुराऐवजी, "खंड (अ-१) आणि (म)" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ७ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये, पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(२) अध्यक्ष किंवा त्याच्या अनुपस्थितीत, कलम ४ चे पोट-कलम (१) याच्या खंड (अ-१) अन्वये नियुक्त केलेले दोन्ही उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे सदस्य असतील तर, त्यांच्यापैकी, अध्यक्षाकडून आदेशान्वये पूर्व-निर्धारित करण्यात येईल असा उपाध्यक्ष महामंडळाच्या बैठकीत अध्यक्ष म्हणून काम पाहील, आणि तिघांच्याही अनुपस्थितीत अन्य उपाध्यक्ष असलेला शासनाचा मुख्य सचिव अशा बैठकीत अध्यक्ष म्हणून काम पाहील:

परंतु, खंड (अ-१) अन्वये नियुक्त केलेले उपाध्यक्ष जर राज्य विधानमंडळाच्या सदस्यां-व्यतिरिक्त अन्य व्यक्ती असतील तर, उपाध्यक्ष म्हणून मुख्य सचिव अध्यक्षाच्या अनुपस्थितीत, बैठकीत अध्यक्ष म्हणून काम पाहील आणि मुख्य सचिवाच्या अनुपस्थितीत अध्यक्षाकडून आदेशान्वये पूर्व-निर्धारित करण्यात येईल असा दुसरा उपाध्यक्ष अशा बैठकीत काम पाहील."

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ६५ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ६५ मध्ये, "उपाध्यक्ष" या मजकुराऐवजी "तिन्ही उपाध्यक्ष" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ७० ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ७० च्या पोट-कलम (१) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(१) ज्या प्रयोजनांसाठी या अधिनियमाअन्वये महामंडळाची स्थापना करण्यात आली होती ती प्रयोजने मुख्यत: साध्य झाली असल्याबद्दल राज्य शासनाची खात्री पटली असेल व त्यामुळे राज्य शासनाच्या मते महामंडळ अस्तित्वात असण्याचे चालू ठेवणे अनावश्यक असेल त्याबाबतीत शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून महामंडळ विसर्जित होईल असे घोषित करता येईल व तदनुसार महामंडळ विसर्जित झाले असल्याचे मानण्यात येईल आणि अशा विसर्जनानंतर मंडळाचे सर्व सदस्य व पदाधिकारी आपापली पदे रिकामी करतील".

१९९६ चा महा.अध्या. १८. ६. (१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (सुधारणा) अध्यादेश, १९९६ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. सन १९९६चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८ ये निरसन व व्यावृत्ती.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा करण्यात आलेली कोणतीही कार्यवाही ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाअन्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा, यथास्थिति, कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई